लोकमत

# एनआयओ-बिट्स पिलानीमध्ये शैक्षणिक करार

लोकमत न्यूज नेटवर्क

**पणजी :** सीएसआयआर-राष्ट्रीय समुद्र विज्ञान संस्था आणि बिट्स पिलानी, के. के. बिर्ला, गोवा यांच्या दरम्यान आज (मंगळवारी) परस्पर सामंजस्य करार करण्यात आला. दोन्ही संस्थांदरम्यान जीवशास्त्र, रसायनशास्त्र, सागरी उपकरणे, उच्च क्षमतेच्या संगणक क्षेत्रात दीर्घकालीन शैक्षणिक, संशोधन आणि प्रशिक्षण करारावर स्वाक्षरी करण्यात आली. सीएसआयआर-एनआयओचे संचालक प्रा. सुनील कुमार सिंग, बिट्स पिलानीचे संचालक प्रा. सुमन कुंडू यांनी करारावर स्वाक्षरी केली. याप्रसंगी बिट्स पिलानीचे प्रशासकीय संचालक डी. एम. कुलकर्णी, प्रा. मीनल कौशिक आणि एनआयओचे डॉ. व्ही. व्ही. सनील कुमार, व्यंकट कृष्णमूर्ती उपस्थित होते.

सीएसआयआर-राष्ट्रीय समुद्र विज्ञान संस्था आणि के. के. बिर्ला बीटस् पिलानी संस्थेदरम्यान विविध वैज्ञानिक आणि शास्त्रीय विषयांवर सहकार्य केले जाते. या करारामुळे सागरी संशोधनात दोन्ही संस्थांच्या परस्पर सहकार्याने काम केले जाईल. सामंजस्य करारामुळे दोन्ही सागरी संशोधन क्षेत्रातील कौशल्याचा वापर आणि सामायिकरण दोन्ही संस्थांसाठी सुलभ होईल.